माहिती हवीय?

सचिन शिवाजी शिर्के, भंगळवेढा.

□ ***माझं घर माझा संसार* या चित्रपटात अजिंक्य देवची नायिका कोण होती?**

— मुग्धा चिटणीस. आज ती हयात नाही. कर्करोगाच्या आजाराने तिचे अकाली निधन झाले.

रोमेश भंडारी, वास्को-द-गामा.

□ **राधा सलूजा नामक कोणी अभिनेत्री आपल्या चित्रपटात होती काय?**

— सतराच्या दशकात पुण्याच्या फिल्म इंस्टिट्यूटमधून अभिनयाचा डिप्लोमा घेतलेल्या काही अभिनेत्री चित्रपटात आल्या होत्या. राधा सलूजा या अभिनेत्रीपैकी एक होती. *दोराहा, लाखों में एक* यासारख्या काही चित्रपटांत ती चमकली. पण तिला फारसं यश मिळालं नाही. संकलिका स्वर्गीय रेणू सलूजाची ती बहीण. राधाला अभिनेत्री म्हणून फारसं यश मिळालं नाही. पण रेणूने मात्र संकलिका म्हणून चांगलं यश मिळवलं.

दीपाली आर. सूर्यवंशी, बडोदा.

□ **अभिनेता स्वर्गीय शेख मुख्तारने कोणकोणत्या चित्रपटात भूमिका केल्या?**

— *एक ही रास्ता, रोटी, बहन, श्रीकृष्ण भक्त, बोगणा, रोहनशहा बाबर, दादा, दारा, मंगू, उस्ताद पेड्रो, दो उस्ताद, चंगेज खान, डाकू की लडकी, दुनिया ना माने, भूख, बडा आदमी, दिल्ली का दादा, मिस्टर लंबू, बदमाश, बादबान, बारूद, उम्र कैद, बिरजू उस्ताद, डाकू मानसिंह, दो दुश्मन, शैतान, एक रात, फैसला, गंगू दादा, हम सब उस्ताद है, फैसला, घायल, गुनहगार, इन्सान और शैतान, इन्स्पेक्टर, मेरा दोस्त, लंबू इन हाँगकाँग, कैदी नं. ९११, सबका उस्ताद, स्पॉय इन गोवा, तेल मालिश बुट पॉलिश, ठाकूर जर्नेल सिंह, उस्ताद ४२०, उस्तादों के उस्ताद, नूरजहाँ.*

भरत चंद्रकांत कालुवाला, माहीम कॉजवे.

□ ***ये रात फिर न आयेगी* हा चित्रपट कधी प्रदर्शित झाला होता? कलाकार, संगीतकार, निर्माता-दिग्दर्शक कोण?**

— *यह रात फिर न आयेगी* या नावाचे दोन चित्रपट आतापर्यंत निर्माण झाले आहेत. पहिला १९६६ला. कलाकारः विश्वजीत, शर्मिला टागोर, मुमताज, पृथ्वीराज कपूर, असित सेन, हेलन, बी.एम.व्यास, शैलेशकुमार. संगीतकार-ओ.पी.नय्यर, निर्माता-श्रीकृष्ण फिल्म्स्, दिग्दर्शक ब्रिज. दुसरा *यह रात फिर न आयेगी* १९९२ला. कलाकार-जितेंद्र, मीनाक्षी शेषाद्री, सुजीतकुमार, अनिल धवन, नीलम मेहरा, अरुणा ईराणी, संगीतकार-राजेश रोशन, निर्माता-झाकीर हुसेन, फिल्म्स दिग्दर्शक-नुसरत सईद.

प्रिया सावंत, इचलकरंजी.

□ ***भक्त प्रल्हाद* व *बजरंगबली* हे चित्रपट केव्हा प्रदर्शित झाले होते? कलाकार, संगीतकार, निर्माता, दिग्दर्शक कोण?**

— १९३३ला *भक्त प्रल्हाद* या नावाचा एक मराठी चित्रपट आला होता. व १९५९ला एक हिंदी. मराठीचे कलाकार-मा. मोहन बंर्वे, दादासाहेब साळवी, रत्नप्रभा, शकुंतला, वेदपाठक, वर्णे, जावडेकर, वसंतराव पहेलवान, भोसले, संगीत अण्णासाहेब माईणकर, निर्माता-सरस्वती सिनेटोन, दिग्दर्शक-के.पी.भावे. १९५९च्या हिंदी *भक्त प्रल्हाद*चे कलाकार होते. अचला सचदेव, कमल कपूर, मारूती, तिवारी. संगीतकार एस.एन.त्रिपाठी, निर्माता-चित्रभारती, दिग्दर्शक-राजा याज्ञिक.

बजरंगबली १९५६ला पड्यावर आला होता. कलाकार-महिपाल, निरूपा रॉय, तिवारी, मिनू मुमताज व चंद्रशेखर. संगीतकार-एस.एन.त्रिपाठी. निर्माता-चित्रभारती, दिग्दर्शक-मणीभाई व्यास.

पी.एस. म्हापसेकर, म्हापसा गोवा.

□ **गायिका नूरजहाँने कोणकोणत्या हिंदी चित्रपटात भूमिका केल्या? प्राणने कोणत्या चित्रपटात तिच्याबरोबर नायकाची भूमिका केली?**



नूरजहाँ आणि सुरैया *अनमोल घडी*मध्ये

— *खानदान, गांव की गोरी, नौकर, दिल, दोस्त, मिर्झा साहिबां, बडी माँ, झीनत, अनमोल घडी, लाल हवेली, जुगनू, भाईजान, नादान, हमजोली, दुहाई* या चित्रपटात नूरजहाँने भूमिका केल्या. पाकिस्तानला गेल्यावर तेथे काही चित्रपटात तिने भूमिका केल्या. या चित्रपटांपैकी *इंतजार* व *दुपट्टा* हे तिचे दोन पाकिस्तानी चित्रपट भारतात आले होते. *खानदान* तिची भूमिका असलेला पहिला चित्रपट. या चित्रपटात प्राण तिचा नायक होता.

मंथन रावत, धुळे.

□ ***भाऊबीज* व *गावची इज्जत* या चित्रपटाचे गीतकार व संगीतकार कोण?**

— *भाऊबीज*चे गीतकार कवी संजीव. संगीतकार वसंत मोहिते. *गावची इज्जत*चे गीतकार सौ. मीना बीडीकर, संगीतकार कुमारसेन गुप्ते.

अनिल ठाकूर, महाबळेश्वर.

□ **'मैं तो तेरे हसीन खयालों मे खो गया...' हे रफीने गायलेले गाणे कोणत्या चित्रपटातील? कलाकार, गीतकार, संगीतकार, निर्माता-दिग्दर्शक कोण?**

— १९६५च्या *संग्राम*मध्ये हे गाणे होते. कलाकार-दारासिंह, गीतांजली, रंधवा, मारूती, अरुणा ईराणी, किंगकाँग, गीतकार-ऐरा कँवर, संगीतकार-लाला-असर-सतार. निर्माता-फिल्म्स इंडिया, दिग्दर्शक-बाबूभाई मिस्त्री.

बाळकृष्ण नाबर, बदलापूर.

□ ***सती सावित्री* या चित्रपटात खलनायक राजाची भूमिका करणारा अभिनेता कोण?**

— बी.एम.व्यास.

अ. दे. पालखे, जळगाव.

□ **अशोककुमार, किशोरकुमार, राज मेहरा यांची भूमिका असलेल्या एका चित्रपटात किशोरकुमारचा एक मुका मुलगा दाखवला आहे. तो कोण? तसेच त्या चित्रपटाचे नाव काय?**

— चित्रपटाचे नाव *दूर गगन की छाव में*. या चित्रपटात अशोककुमार नव्हता. किशोरकुमारचा मुलगा अमितकुमार या चित्रपटात मुक्या बालकलाकाराच्या भूमिकेत चमकला होता. त्याची भूमिका असलेला हा पहिलाच चित्रपट होता.

रमेश कमल कोळी, नवघर, कोळीवाडा.

□ **अमजद खानचा पहिला चित्रपट?**

— १९७३चा *हिंदुस्तान की कसम*.

अनिकेत मारुती कोळी, नवघर.

□ **ओमपुरीचा पहिला चित्रपट कोणता?**

— १९७८चा *गोधूली*.